कृषि ज्ञानाची समृध्दि देणारे मासिक

# धान्यलक्ष्मी

मे २००६ - मुल्य रु. २५/-





- डॉक्टर ऑफ सायन्स भंवरलालजी जैन यांचे विचार
- सिताफळातला दुसरा महानोर
- ॲनोना २ - हनुमान सिताफळ
- तुर लागवड
- सोयाबीनचे बिजोत्पादन
- कोळंबी संवर्धन
- शेतीचा जमाखर्च कसा मांडाल
- मातीपरीक्षण का व कशासाठी
- वर्षभर उत्पादनासाठी निशिगंध









धान्यलक्ष्मी

कृषि ज्ञानाची समृद्धी देणारे मासिक

RNI REGD. NO. MAHMAR /2003/12278

वर्ष : ४, अंक : २

मे २००६

मुल्य : २५ रुपये



**मा. प्रमुख संपादक :**
राजन अहिरे पाटील

**सल्लागार संपादक मंडळ :**
श्री. अ. ल. वल्लाळ
श्री. विजय कुलकर्णी,
श्री. प्रदीप अजमेरा
श्री. विनोद मालपाणी

**मुखपृष्ट व मांडणी :**
आर्ट ॲण्ड आयडीयाज,
नुर कॉम्प्युटर्स,


## वर्गणीचे दर

वार्षिक वर्गणी रु. २०० /-
द्वैवार्षिक वर्गणी रु. ३५० /-
त्रैवार्षिक वर्गणी रु. ५२५/-
पंचवार्षिक वर्गणी रु. ८७५/-
दशवार्षिक वर्गणी रु. १७५०/-
वर्गणीदार कुठल्याही महिन्यापासून होता येते.

**पत्रव्यवहार व वर्गणी श्री राजलक्ष्मी प्रकाशनाच्या नावे पाठविण्याचा पत्ता :**


## श्री राजलक्ष्मी प्रकाशन

रजि. कार्यालय : ६, विपुल अपार्टमेंट,
ॲपेक्स हॉस्पीटल जवळ, गादीया पार्क,
जालना रोड, औरंगाबाद-४३१ ००१.
दुरध्वनी : ०२४०-२३२८३३८.
E-mail : dhanyalaxmi1@redifmail.com



अंकातील लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या अंकातील सर्व लेखांचे /मजकुरांचे हक्क राखून ठेवले आहेत.

**औरंगाबाद न्यायालयीन कक्षेअंतर्गत**


# अंतरंग


- संपादकिय — २
- नियोजनयुक्त शेती– शेती व्यवसायातील यशाचे गमक — ३
  माधवराव धांदे
- हिंदी काव्यातून व्यक्त झालेली हवामान परिस्थिती — ५
  सुधीर सेवेकर
- माती परिक्षण का व कशासाठी — ६
  प्रा. प्रशांत नामदेवराव मगरे
- डॉक्टर ऑफ सायन्स भवरलालजी जैन यांचे विचार — ११
- शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाची कारणे व उपाय — १५
  डॉ. बी. आर. पवार, कु. डी. बी. पवार
- शेतीचा जमाखर्च कसा मांडाल ? — १७
  दत्तात्रय जिवराम चौधरी
- शेतकऱ्यांसाठी कृषि तंत्रज्ञान प्रसारणाच्या उपयुक्तविस्तारपध्दती — २०
  डॉ. पंडीत खर्डे
- हिरव्या चाऱ्याची मुरघासाद्वारे साठवणुक — २२
  म्हस्के, अतकरे, मुन्नरवार
- ॲनोना-२ हनुमान सीताफळ — २४
  बी. डी. लोंढे
- WTO व शेती उत्पादनाचे महत्व — २७
  राजेश दिगंबरराव शेळके
- मराठवाड्यातील जनतेची फळांची वाढती गरज एकअवलोकन — २९
  राजेश दिगंबरराव शेळके
- हनुमान फळ — ३१
  कृषिभूषण वि.ग.राऊळ
- बेल फळ उत्पादन व प्रक्रिया — ३३
  प्रा. राजेंद्र केंघे, मोरे, उंडे.
- मार्च-एप्रिलमध्ये गावठी बोरीची छाटणी... — ३४
  राजेंद्र वानखडे.
- सीताफळाचा उन्हाळी हंगाम — ३५
  कृषिभूषण वि.ग.राऊळ
- सीताफळातला दुसरा महानोर — ३६
  राजन अहिरे पाटील
- शेतकऱ्यांवर अन्याय करणारा जलसंपत्ती प्राधिकरण कायदा-२००५ — ३९
  दिलीपराव देशमुख बारडकर
- वर्षभर उत्पादनासाठी निशिगंध — ४०
  प्रा. शालीनी वडगे, खिरटकर, दमके
- फुल शेती जरबेरा — ४३
  कृषिभूषण वि. ग. राऊळ
- मत्स्य प्रक्रियेसाठी आधुनिक पध्दतीचा वापर– काळाची गरज — ४५
  रविंद्र बोंद्रे, विजयकुमार मुळे.
- क्षारपड देतील धन, हाती घेता कोळंबी संवर्धन — ४८
  सचिन साटम, संतोष कुंजीर.
- गोड्या पाण्यातील कोळंबी : रोग व उपाय — ५३
  सचिन साटम, मंदार राऊळ.
- शेतकऱ्यांची फसवणुक होऊ नये यासाठी धान्यलक्ष्मीने जागल्या होण्यात... — ५७
  सुधीर सेवेकर
- सोयाबीनचे बिजोत्पादन — ५८
  डॉ. शांती पाटील, वंदना कळमकर
- सोयाबीन उपयुक्तता व प्रक्रिया — ६३
  सचिन होळकर
- नव्या बी. टी. वाणांना मान्यता — ६५
  सुधीर सेवेकर
- विहीर पुर्नभरण — ६६
  सतीष देशमुख
- बी.टी. जिवाणू, किटकनाशके आणि बी.टी. पीके — ६७
  डॉ.म.वा. ठोंबरे, तावरे, मोरे.
- साठविलेल्या धान्यावरील किडींचे नियंत्रण — ७२
  प्रा. अजय मिटकरी, प्रा. सोनुने
- कोरडवाहू कापूस लागवडीचे तंत्रज्ञान — ७३
  डॉ. बी. बी. भोसले, मोरे, बेग.
- तूर लागवड — ७४
  डॉ. बाळकृष्ण जमदग्नी, माटे, तागट
- अनुभव मधुमकेचे — ७७
  कृषिभूषण वि. ग. राऊळ.
- फुलकोबी लागवडीचे सुधारीत तंत्र — ७८
  राजेंद्र वानखडे
- धानाच्या सेंद्रीय शेतीसाठी आवश्यक घटक — ८०
  डॉ. प्रविण महातळे, गवई.
- स्फुरद विरघळविणारे जीवाणू खत वापरा, कडधान्याचे उत्पादन वाढवा — ८३
  आर. एस. धावडे, सोळुंके
- चिंतन शाश्वत शेतीचे : चिंतन उपलेंचवारांचे — ८५
  भैय्यासाहेब उपलेंचवार
- पीक हवामान दिनदर्शिका — ८६



धान्यलक्ष्मी हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्री रा.का. अहिरे पाटील यांनी मालक सौ. राजश्री रा. अहिरे पाटील यांच्यासाठी अनिता प्रिंट हाऊस, एल-४/१०-१, श्रीरामनगर, सिडको, औरंगाबाद-४३१ ००३ येथे छापून ६, विपुल अपार्टमेंट, गादीया पार्क, जालना रोड, औरंगाबाद ४३१ ००१ येथून प्रकाशित केले.
**– संपादक रा. का. अहिरे पाटील.**

# भवरलालजी जैन यांना कोकण कृषि विद्यापीठाची 'डॉक्टर ऑफ सायन्स' पदवी प्रदान

दापोलीच्या डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठात आज संपन्न झालेल्या २६ व्या दीक्षांत समारंभात जळगाव येथील जैन इरिगेशनचे संस्थापकीय शिल्पकार भवरलालजी जैन यांना 'डॉक्टर ऑफ सायन्स' ही बहुमानाची पदवी प्रदान करून सन्मानित करण्यातआले. विद्यापीठाचे कुलगुरु मा. डॉ. शंकरराव मगर यांच्याहस्ते भवरलालजी जैन यांना 'कृषि व जलसिंचन, फलोद्यान आणि ठिबक या क्षेत्रात उलेखनीय कार्य केल्याबद्दल 'डॉक्टर ऑफ सायन्स' ही पदवी बहाल करण्यात आली.



*डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठातर्फे श्री. भवरलालजी जैन यांना 'डॉक्टर ऑफ सायन्स' ही पदवी बहाल करतांना कुलगुरु डॉ. शंकरराव मगर मागे भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे महानिदेशक मा. डॉ. श्री. मंगला राय व इतर मान्यवर.*

श्री. जैनयांनी आपल्या व्यवसायाची सुरुवात शेती अवजारे, किटकनाशके, बी-बीयाणे, ट्रॅक्टर अशा शेती साधनसामुग्रीच्या व्यवसायाने केली. परंतु त्यानंतर 'ठिबक सिंचन' क्षेत्रात त्यांनी केलेली कामगिरी उल्लेखनीय आहे. आजमितीस या क्षेत्रात १५ लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्र जैन ठिबक तंत्रज्ञानाच्या आधारे ओलिताखाली आहे. महाराष्ट्र आणि विशेषतः कोकणही त्यात अग्रेसर आहे. सन १९९४ मध्ये श्री. जैन यांनी केळीची रोपे ऊतीसंवर्धित तंत्रज्ञानाद्वारे निर्मिती करण्यास सुरुवात केली व आज या तंत्राद्वारे लागवड केलेले क्षेत्र २४ हजार एकर पर्यंत पोहोचले आहे. आंबा, आवळा, केळी, पेरु या फळांवरील प्रक्रिया करण्याचा आशिया खंडातील सर्वात मोठा प्रकल्प त्यांनी सुरु केला आहे.

श्री. जैन यांच्या प्रयोगशील प्रवृत्तीने जैन हिल्सच्या उजाड माळाचा 'कृषि पंढरी' म्हणून उदय झाला. तसेच फळपिकांची लाखो झाडे, जागतिकदर्जाची जैवतंत्रज्ञान प्रयोगशाळा, अत्याधुनिक हरित व शीतगृहे, आदर्श पाणलोट क्षेत्र आणि अद्ययावत फळप्रक्रिया प्रकल्प उभे राहिले.

त्यांच्या या कर्तृत्वामुळे त्यांना आतापर्यंत राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील एकूण १६ पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. यामध्ये फाय फाऊंडेशन, जमनलाल बजाज, गांधी-आंबेडकर सामाजिकन्याय पुरस्कारांचा समावेश आहे. अमेरिकन इरिगेशन असोशिएशनच्या 'क्रॉफर्ड रिड मेमोरियल' हा आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळविणारे ते पहिले भारतीय आहेत. त्यांच्या अमेरिकेबाहेरील देशांमध्ये ठिबक सिंचनाचा प्रचार व प्रसार केल्याबद्दल हा पुरस्कार देण्यात आला. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठानेही त्यांना त्यांच्या कृषि व सामाजिक क्षेत्रातील कार्याचा गौरव म्हणून डॉक्टर ऑफ लेटर्स ही पदवी नुकतीच प्रदान केली आहे.

डॉ. मंगला राय यांच्या हस्ते भाऊंना गौरवपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी आपल्या भाषणात बोलतांना ते म्हणाले, 'खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणात शेतकऱ्यांना टिकवायचं असेल तर त्यांनी आधुनिक कृषि तंत्रज्ञानाचा अंगिकार करणे गरजेचे आहे. जे तंत्रज्ञान ठिबक, टिश्युकल्चर इ. माध्यमांनी भवरलालजी जैन यांनी सर्वांसाठी खुले केले आहे. ठिबक सिंचनाच्या माध्यमातून पाण्याचा योग्य वापर करण्याची नवी दिशा आपण सर्वांना त्यांनी दिली आहे.' अशा शब्दात त्यांनी भवरलालजी जैन यांचा गौरव केला.

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. शंकरराव मगर यांनी श्री. जैन यांना दिलेल्या गौरवपत्रात प्रतिपादन केले आहे की, 'जलसंधारण व सुक्ष्मसिंचनाद्वारे जलव्यवस्थापन ही कोकण भूमीची भूक भागल्यास शेतीमध्ये जगात कोकण अग्रेसर राहील. कठोर परिश्रम, पारदर्शकता, वैचारिक प्रगल्भता, नैतिकता ही आपली जीवनमुल्ये निश्चितपणे सर्वांनाच मार्गदर्शक ठरतील. देशाला आपल्या सारख्या कृतिशील विचारवंतांची गरज आहे. म्हणूनच या विचारांचा, त्या प्रत्यक्षात आणणाऱ्या कृतीचा आणि पर्यायाने आपल्यासारख्या कृषिकेंद्रीत, कृतिशील विचारवंतांचा हा मन:पूर्वक गौरव आहे.' या गौरवाचा स्वीकार केल्याबद्दल मा. कुलगुरुंनी श्री. जैन यांचे मन:पुर्वक आभार व्यक्त केले.

या गौरवास उत्तर देतांना भवरलालजी म्हणाले, 'खरं तर हा व्यक्तीशः माझा सन्मान नसून सर्व शेती बांधवांचा आहे. बलशाली भारताचं स्वप्न साकार व्हायचं असेल तर शेती आणि शेतकऱ्यांचा आदरसत्कार होणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवून त्यांच्या गौरवगाथांना ज्यावेळी यथोचित प्रसिद्धी मिळेल त्यावेळी आजच्या काहीशा उदास वातावरणात बदल घडून कृषि प्रगतीच्या दृष्टीने आपण २१ व्या शतकाकडे वाटचाल करता येईल. असे प्रतिपादनही त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापिठाचे कुलगुरु मा. डॉ. शंकरराव मगर होते तर नवी दिल्लीस्थित भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे महानिदेशक मा. डॉ. मंगला राय, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद पुणेचे उपाध्यक्ष मा. ना. विजयरावजी कोलते हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी उपस्थितांमध्ये जळगांवचे आ. सुरेश दादा जैन, डॉ. सुभाष चौधरी, डॉ. जे. के. दोशी, आनंद गुप्ते, शरद वाणी, नातू अथांग जैन, पुतणे अभय जैन, विद्यापीठाच्या सर्व विभागांचे डीन, विद्यार्थी तसेच कोकण व आसपासच्या भागातून मोठ्या प्रमाणात शेतकरी बांधव, कंपनीचे वितरक बंधू व अनेक सहकारी इ. उपस्थित होते.

✍✍✍

# कुलगुरु, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांच्या तर्फे गौरवपत्र

**मा. श्री. भवरलाल जैन,**

भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांनी देशात सर्वप्रथम (१९९७) उत्कृष्ट कृषि विद्यापीठाचे पारितोषिक दिलेले हे डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ 'कृषि व जलसिंचन, फलोद्यान आणि ठिबक' चे संस्मरणीय उल्लेखनीय कार्य केलेल्या आपणांस 'डॉक्टर ऑफ सायन्स' (D.Sc.) ही सर्वोच्च बहुमानाची पदवी प्रदान करुन आपला सन्मान करीत आहे. अशा प्रकारे कोकण सुपुत्र कै. पी. के. उर्फ बाळासाहेब सावंत यांनी सुरु केलेल्या सामाजिक बांधिलकीचा वसा पुढे चालवितांना विद्यापीठास विशेष आनंद व उल्हासाची अनुभूति होत आहे.

आपला जन्म दुष्काळाच्या छायेत असलेल्या छोट्याशा 'वाकोद' (ता. जामनेर, जि. जळगांव), या खेडेगावात एका सर्वसाधारण कुटूंबात झाला. निरक्षर माता व अल्पशिक्षीत पिता यांच्या संस्कारातून मिळालेली संस्कारक्षम एकात्मतेची भावना हीच आपली अलौकिक शिदोरी व संपत्ती. लोकजीवनातून अनुभवलेली संस्कृती, शेती-मातीवर प्रेम, कष्टकऱ्यांच्या श्रमातून पाहिलेला कर्मसंस्कार आणि गरिबांचे अश्रू पुसण्याची धडपड हे आपल्या जीवनाचे विशिष्ट पैलू. 'वाकोद' खेडेगावात रुजलेले कसदार बी. जोमदार रोपट्यांच्या रुपाने जळगाव येथील माध्यमिक शिक्षणात बहरले आणि मुंबई येथील उच्च शिक्षणाने वटवृक्षासारखे विशाल झाले. विविध पदव्यांनी विभूषित असूनही शहरी जीवनाकडे पाठ फिरवत, मिळालेल्या राजपत्रित नोकरीच्या मागे न लागता कृषि उद्योग-व्यवसाय करण्याचा धाडसी निर्णय आपण त्या काळी घेतला. सुरुवात अल्प भांडवलातून केली. स्वप्नातला बलशाली भारत खेड्यातून वाढेल हा आपला दृढ विश्वास आहे. 'खेड्याकडे चला' हा महात्मा गांधीजींचा संदेश आपण सळसळत्या उत्साहाने कृतीत उतरवला. महत्प्रयासाने, पराकाष्ठेने, श्रमसंकल्पनेने, यशाने न हुरळता, अपयशाने न खचता, जळगावस्थित आपल्या उद्योगांमार्फत कर्मभूमीचे नाव जगाच्या नकाशावर कोरण्याचे महान कार्य आपण केलेत.

आपल्या कर्तृत्वाचा 'शेती व शेतकरी' केंद्रबिंदू ठरला. शेती अवजारे, कीटकनाशके, बी-बीयाणे, ट्रॅक्टर अशा शेती साधनसामुग्रीच्या व्यवसायाने आपण सुरुवात केली. पण खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांच्या हृदयाचे सम्राट झालात ते 'ठिबक सिंचन' चा आपल्या देशात ओनामा करुनच! माळरानाचं रुपांतर नंदनवनात केले. देशाच्या कानाकोपऱ्यात विविध पिकांना वरदानीत करुन आपण भूमिपुत्रांचे मूक आशिर्वाद पदरात पाडून घेतलेत. ग्रामस्थांच्या हातांना काम आणि शेत मालाला दाम देऊन त्यांच्या जीवनात आनंदाचा झरा निर्माण केलात.

आपली कृषि आधारित औद्योगिक वाटचाल १९७८ साली सुरु झाली ती केळी पावडरच्या आजारी कारखान्यामध्ये पपई चिकापासून पेपेन बनविण्याच्या उद्योगातून. पण व्यापक प्रमाणात देशभर सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या हृदयात आपण स्थानापन्न झालात ते पीव्हीसी पाईपच्या १९८० मध्ये सुरु झालेल्या प्रकल्पाने. त्यानंतर आपली ठिबक सिंचनाची संकल्पना मात्र संबंध देशाला पाणी नियोजनाबद्दल दिशा देणारी संजीवनीच ठरली. आजमितीस देशात १० लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्र आपल्या जैन ठिबक तंत्रज्ञानाच्या आधारे ओलिताखाली आहे. महाराष्ट्र आणि कोकणभूमि त्यात अग्रेसर आहे. आपणांस लोकांचे अलोट प्रेम आणि लोकाश्रय मिळाला. १९९४ मध्ये श्रीगणेशा केलेली केळीची ऊत्तीसंवर्धित रोपे अल्पावधीत देशभर लोकप्रिय झाली व त्याचेही क्षेत्र २४ हजार एकरावर पोहचून वाढत आहे. प्रगल्भ दूरदृष्टीतून उत्पादित मालावर प्रक्रिया करण्याचा यशस्वी उद्योग आपण राबविला. आंबा, आवळा, केळी, पेरु फळावरील प्रक्रियांचा आशियाई खंडातील मोठा प्रकल्प सुरु करण्याचे आपले स्वप्न पुर्ण झाले. कांडी कोळशापासून ठिबक सिंचनापर्यंतचा आपला प्रवास हा ग्रामिण व कृषि जीवनाशी आपल्या बांधिलकीचा जणू जिवंत व ज्वलंत आलेख आहे.

कृषि तंत्रज्ञान आणि कृषि माहिती प्रसारण हे आपले आवडते विषय. आपल्या प्रयोगशील प्रवृत्तीने मोहाडीसारख्या उजाड माळाचा 'कृषि पंढरी' म्हणून उदय झाला. फळपिकांची लाखो झाडे, जागतिक दर्जाच्या जैवतंत्रज्ञान प्रयोगशाळा, अत्याधुनिक हरित व शीतगृहे, आदर्श पाणलोट क्षेत्र आणि अद्ययावत फळप्रक्रिया प्रकल्प उभे राहिले. आपल्या अशा दिव्य दृष्टीची फळे आपण सदर प्रकल्पांच्या प्रचार-प्रसाराने सामान्य शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविली.

वाचन, चिंतन आणि मार्मिक लेखन यांचा छंद म्हणून नव्हे तर उत्तम जीवनाचे अंग म्हणून स्विकार करुन आपण सुसंस्कारित झाला. चिंतनशील कृषि व्यवसायापासून ते गांधी आंबेडकर सामाजिक न्याय मंचापर्यंत आपण आयुष्यभर ताठ मानेने उभे आहात. आतापर्यंत राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील १३१ पुरस्कार पटकावित आपण एक उच्चांक गाठला आहे. यामध्ये फाय फाऊंडेशन, जमनलाल बजाज आणि गांधी आंबेडकर सामाजिक न्याय पुरस्कार हे आपल्या पुरस्कार मुकुटावरील हिरे-माणके आहेत. यांच्यावर कळस चढविण्याचे काम केले ते नामांकित अमेरिकन सिंचन आयोगाच्या 'ठिबक सिंचन' पुरस्काराने. हा पुरस्कार मिळविणारे आपण पहिले भारतीय आहात, याचा आम्हा सर्वांना सार्थ अभिमान आहे.

कोकण ही परशुरामाच्या पदस्पर्शाने पुनीत झालेली निसर्गसंपन्न भूमी आहे. प्रचंड जलसंपत्तीचा वारसा तिच्याजवळ आहे. जलसंधारण आणि सूक्ष्मसिंचनाद्वारे जलव्यवस्थापन ही या भूमीची भूक भागल्यास शेतीमध्ये जगात कोकण अग्रेसर राहील. आधुनिक कृषितंत्रज्ञान प्रसारण हे या भूमिला निश्चितपणे अमृत ठरेल.

आपल्या आयुष्यात संकल्प आहे, संकटांशी सामना आहे, संघर्ष आहे, सार्वजनिक विचार आहे, विशेष म्हणजे समतोल आहे. कठोर परिश्रम, पारदर्शकता, वैचारिक प्रगल्भता, नैतिकता ही आपली जीवनमुल्ये निश्चितपणे सर्वांनाच मार्गदर्शक ठरतात. देशाला आपल्यासारख्या कृतिशील विचारवंतांची गरज आहे. म्हणूनच या विचारांचा, त्या प्रत्यक्षात आणणाऱ्या कृतीचा आणि पर्यायाने आपल्यासारख्या कृषिकेंद्रीत कृतिशील विचारवंतांचा हा मनःपुर्वक गौरव.

मा. कुलपती, महामहीम राज्यपाल महाराष्ट्र राज्य, कार्यकारी परिषद आणि विद्या परिषद, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ यांच्यावतीने आपल्या आरोग्य संपन्न दीर्घायुष्याची प्रार्थना करुन सहर्ष मनाने हे गौरवपत्र आपणांस प्रदान करतांना मला मनस्वी आनंद होत आहे.

कृपया या गौरवाचा आपण स्विकार करावा.

# डॉक्टर ऑफ सायन्स' पदवीदान समारंभाप्रित्यर्थ भवरलालजी जैन यांचे विचार..

कोकण भारत देशासाठी ललामभूत ठरलेल्या अनेक दिग्गज रथी-महारथींची जन्मभूमी आहे. एवढंच नव्हे, तिने जगाला आणि विशेषत्वे सिलिकॉन व्हॅलीलासुध्दा आपल्या प्रसादाने लाभान्वित केले आहे. रत्नागिरी हा भारत देशातील असा एकमेव जिल्हा आहे ज्याने तीन भारतरत्नांना जन्म दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. पांडुरंग काणे, व डॉ. अण्णासाहेब कर्वे. विशष म्हणजे यापैकी पहिले दोन दापोली तालुक्यानेच देशाला दिले. रँगलर परांजपे, लोकमान्य टिळक, रेव्हरंड टिळक, कवि केशवसुत, साने गुरुजी – हा अमूल्य ठेवासुध्दा दापोलीनेच बहाल केला. उभ्या महाराष्ट्रालाच नव्हे तर देशाला. गणितापासून कवितेपर्यंत, जहाल असो की मवाळ, अनेक समाजधुरीण झाले ते येथेच. म्हणूनच दापोली केवळ ऐतिहासिक स्थान नसून राष्ट्रपुरुषांची खाण आहे. ७०० कि.मी. समुद्र किनारा हे या रम्य निसर्गभूमीला मिळालेले दुसरे अजोड वरदान आहे.

१८८० च्या ए.जी. हायस्कूलचा वारसा पुढे चालविणारे सह्याद्रीच्या कुशीत वाढलेले आपले हे कृषि विद्यापीठ या उदात्त परंपरेचा, उज्वल इतिहासाचा परिपाक आहे, या तेजोमय पार्श्वभूमीवर माझ्यासारख्या शेतीउद्योग-व्यवसायात मग्न असणाऱ्या सर्वसामान्य व्यक्तींचा सन्मान व्हावा हा खरंच व्यक्तीशः माझ्या दृष्टीने भाग्याचा क्षण आहे. शेतकरी वर्गाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या आपल्या विद्यापीठाने हा बहुमान माझ्यासारख्या हाडाच्या शेतकऱ्याला दिला. याबद्दल प्रथमतः मी विद्यापीठाचे ऋणनिर्देश करतो व सदर गौरव सादर सप्रेम स्विकारतो.

खरं तर हा व्यक्तीशः माझा सन्मान नसून सर्व शेती बांधवांचा आहे. बलशाली भारताचं स्वप्न साकार व्हायचं असेल तर शेती आणि शेतकऱ्यांचा आदर सत्कार होणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवून त्यांच्या गौरवगाथांना ज्यावेळी यथोचित प्रसिद्धी मिळेल त्यावेळी आजच्या काहीशा उदास वातावरणात बदल घडून कृषि प्रगतीच्या दृष्टीने आपण २१ व्या शतकाकडे वाटचाल करीत आहोत असे आपणांस म्हणता येईल. असे घडवून आणण्यासाठी विद्यापीठाला, आमच्या सारख्या व्यावसायिक संस्थांना व माझ्या कोकणी शेतकरी बांधवांना विद्यमान स्थितीला सामोरे ठेवून काय करावं लागेल याचा थोडक्यात उहापोह याप्रसंगी करणे औचित्यपुर्ण ठरावे.

कोकणाची विशिष्ट भौगोलिक व ऋतुमानाची परिस्थिती. बराचसा भूभाग सपाट, काही डोंगराळ, उंच सखल, चढ-उतारांचा. राहिलेला समुद्र किनारा. जमीन ओलावा धरून न ठेवण्याच्या क्षमतेची, लहान लहान तुकडेवजा आणि काहीशी आम्ल व क्षारधर्मी. अवघ्या चार महिन्यात धोधो पडणाऱ्या पावसाची बेरीज होते ३०००-४००० मी.मी. उन्हाळ्यात मात्र होतो खडखडाट. हवामान उष्ण व दमट. ५३ टक्के शेतकरी आहेत लहान किंवा अल्पभूधारक.

मुख्य पिकांमध्ये आहेत बहुतांशी पावसाळी आंबा, फणस, कोकम, काजू. इतर भागामध्ये घेतली जातात हंगामी व मसाल्याची पीकं, नारळ, सुपारी, भात, इ. राज्याच्या तुलनेत कोकण जवळपास ९० टक्के आंबा व काजू ९५ टक्के नारळ व सुपारी यांचे उत्पन्न देतो.

कोकणी माणूस पिढ्यानं-पिढ्या आक्रमणांना, अत्याचारांना सामोरे जात राहिला. अस्थिर, असुरक्षित व संकटमय जीवन तो जगला. काळाच्या ओघात त्याचा मुळ स्वभाव आणि संस्कृती मावळत मावळत जाऊन त्याचे स्वरुप चळवळ्या, काहींसा उतावीळ, वितंडवादी, हट्टी, भांडकुदळ असा झाल्याचा तिऱ्हाइतांना भासतो. मी तर त्याला व त्याच्या या स्वभाव-संस्कृतीला बेजोड आणि असामान्य मानतो. याच स्वभाव-संस्कृतीचा उपयोग करुन त्यांनी जर मनावर घेतलं तर कोकणाच्या भूमीवर तेच अक्षरशः स्वर्गाला उतरवू शकतात.

या कार्यासाठी विद्यापीठाला ते आहे त्यापेक्षा जास्ती समाजोन्मुख व्हायला व्हायला लागेल. आपल्या कार्याच्या व कर्तव्याच्या सीमांचे विस्तारीकरण करावे लागेल. विद्यापीठाने जर माहिती, प्रसार व प्रशिक्षण याची जबाबदारी स्वीकारली, एका दुभाषाची व सेतूबांधाची भूमिका अंगिकारली तर शेतकऱ्याला अडत्यांच्या व सावकारांच्या विळख्यातून बाहेर निघता येईल. आमच्यासारख्या व्यावसायिक संस्थांना सामाजिक बांधिलकीपोटी अशी आव्हानात्मक कामं, त्याचं नियोजन व विकास करण्यासाठी योग्य ती उत्पादने, तंत्रज्ञान व ध्येय-धोरणे अवलंबून राबवावी लागतील. मूल्यवर्धनासाठी प्रक्रिया प्रकल्पांचे जाळे कोकणात विणावे लागेल. कराराची शेती संकल्पना इथे रुजवावी लागेल. कोकणी शेतकरी बांधवांना आणि सर्वसामान्य जनतेला एक विधायक व

गतिशील, सृजनशील आणि सांमजस्याची, सामोपचाराची भूमिका स्वीकारावी लागेल. वादासाठी वाद या वृत्तीला फाटा देवून कठोर परिश्रम करण्यासाठी कटिबध्द व्हावे लागेल.

विरोधाभास आणि विपर्यास असावा तरी किती? आंब्यासारख्या फळांचा राजा म्हणून जगमान्य असलेल्या हापूस आंब्याचे माहेरघर आहे कोकणच. परंतु या 'राजावर' प्रक्रिया करणारा एक लहानसा कारखाना कोकणात आला तोही दोन वर्षापुर्वीच. नारळाचं पाणी आता दुधापेक्षा महाग असूनही कोकणी नारळ मात्र प्रक्रियेअभावी आजही नगानेच विकले जातात. त्यावरच्या शेंड्या अजूनही केरळकडे जावून त्यांचेवर प्रक्रिया होवून तेथे त्याच्या बनतात निर्यात लायक विटा, गाद्या, दोरखंड. कोकणात मात्र आहेत लहान मोठे घरगुती, आजारी उद्योग. नाहीं म्हणायला काजूचे कारखाने लहान मोठ्या प्रमाणावर तग धरून आहेत. पण त्यातही सुधारणेला भरपूर वाव आहे. कृषि मालावर प्रक्रिया करुन त्याचं मूल्य वाढविल्याशिवाय शेतीला चांगले दिवस येणे नाही.

डोंगरावरील मोठ्या उतारावर तांत्रिक दृष्ट्या योग्य त्या मोजमापाचे ओटे करुन वनीकरण करणे, कमी उतार असेल तिथे ओटे करुन त्यावर आंबा, काजू, फणस याची लागवड वाढविणे, नारळ व सुपारी बागांमध्ये नगदी व मसाल्यांची आंतरपिके घेणे, डोंगरी जमिनींना लागवडीलायक करणे आता आधुनिक प्रगत तंत्रज्ञानामुळे, लांब पल्ल्याचा विचार करतां, शक्य व फायदेशीर सुध्दा ठरु शकते. अशा डोंगरी पडीक जमिनी कोकणात सुमारे ८ लाख हेक्टर आहेत. त्यांना आपण लागवडीखाली आणू शकू. अर्थात हे काम सोपंही नव्हे.

महाराष्ट्रात पडणाऱ्या एकूण पावसापैकी सुमारे ५० टक्के पाऊस कोकणात पडतो. २० मोठ्या नद्या व सुमारे ८० उपनद्या याचं जाळंच जणू निसर्गानं कोकणात विणलं आहे. शासनानी आतापर्यंत केवळ २ सिंचन प्रकल्प निर्माण केले असून तेही कालव्याआधारित आहेत. वस्तुतः भौगोलिक परिस्थितीचा विचार करता कालव्याआधारित सिंचन कोकणाला फावण्यासारखं नाही. त्याऐवजी या नद्यांवर तांत्रिक दृष्ट्या योग्य तेथे व तसे साखळी सिमेंटचे किंवा मातीचे बंधारे टाकून सदर साठविलेल्या पाण्याचा उपयोग थेट पंपाद्वारे उपसा जलसिंचन योजना राबवून ठिबक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून करणे सर्व हितावह ठरते. कोकणाची १०० टक्के जमीन ओलिताखाली येऊ शकते. तेथे हवी ती पिकं घेण्याला लायक असं हवामान उपलब्ध आहे. नद्यांवर बंधारे टाकत असतांना वीज उत्पादनाचे प्रकल्पसुध्दा राबविता येतील. प्रत्येक मोठ्या नदीचा या संदर्भाने अभ्यास करून एक स्वतंत्र योजना – जलसिंचन व विद्युत निर्मिती योजना – बनविण्यासाठी आयोगाची स्थापना करणे काळाची गरज आहे. पाणी ही एकच वस्तू अशी आहे जी सर्वच प्राणीमात्रांना जीवन बहाल करू शकते.

कोकण हे एक नैसर्गिक हरितगृह आहे म्हणूनच फळं, फुलं, भाजीपाला, ऊस, तेलबिया इत्यादी पिकांचे भरघोस उत्पन्न ठिबक सिंचन तंत्रज्ञानाद्वारे करण्यासाठी शासनाने खाजगीकरणाला सुध्दा प्रायोगिक तत्वावर तरी वाव द्यावा म्हणजे सदर संकलपना मार्गी लागू शकेल. पडणाऱ्या पावसाचे ९० टक्के पाणी मातीसोबत आज वाहून जात आहे. जो देश माती वाया घालवतो तो देश स्वतःच वाया जातो असा शास्त्रज्ञांचा सर्वमान्य दंडक आहे. कोकणची हजारो टन माती दरवर्षी अव्याहतपणे अरबी समुद्राला बहाल केली जाते. ते थांबविल्याशिवाय कोकणचा विकास हे एक स्वप्नच राहील.

कोकण भागात रासायनिक उत्पादनांना स्थानिक विरोध असल्याचे सर्वश्रुत आहे. त्याबद्दल मी तर व्यक्तिशः कोकणी जनतेच्या भावभावनांशी सहमत आहे. पर्यावरण व भौतिक विकास या दोघांचा समन्वय साधता आला नाही तर कालांतरांनी आपण स्वतःचा विनाश ओढवून घेत असतो. तसे करावयाचे नसेल तर कोकणाच्या जल व मृद संपदेचे शास्त्रीय दृष्ट्या नियोजन करून त्याला तंत्रज्ञानाची जोड देऊन शेती आधारित उद्योग व्यवसायच येथे वाढवावेत. त्यामुळे कदाचित कोकणी माणूस भौतिकदृष्ट्या अतिउच्च पदावर पोहोचणार नाही. त्याला स्वतःला तसे करावयाचे आहे असे गृहित धरण्यासही काही आधार नाही. भौतिक विकास व पर्यावरणाचे संरक्षण या दोघांची भागिदारी हाच शाश्वत विकासाचा गुरुमंत्र आहे.

अभिजात बुद्धिमत्तेचा वारसा व वसा कोकणाकडे आहे. त्याचा पुरेपूर फायदा सिलीकॉन व्हॅली अमेरिकेत घेत आहे. ते थांबायचे असेल तर येऊ घातलेल्या सॉफ्टवेअर पार्कपैकी निदान २–४ पार्कस् तरी कोकणाकडे दिले गेले पाहिजेत. माझ्या कोकणी शेतकरी मित्रांनो चळवळ करायचीच असेल, वादंग घालायचे असतील, क्रांती घडवायचीच असेल तर फक्त या दोन कारणांसाठी सज्ज व्हा ! निसर्गानी तुम्हाला बहाल केलेल्या साधनसामुग्रीचा, अक्कल–हुशारीचा उपयोग व विकास करण्यासाठीच आपण भांडणार आहात. यात वावगे ते काय?

कोकण विकासाचा मंत्रः सिंचन आणि सॉफ्टवेअर! 'We will not merely stand & stare."

आपण मला इथं बोलावून गौरवान्वित केल्याबद्दल आपले पुनश्च आभार मानून शब्दांना विराम देतो.

जय हिंद. जय महाराष्ट्र.